**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत आणि युनायटेड किंग्डम नैसर्गिकरीत्या भागीदार असून लोकशाही, स्वातंत्र्य आणि कायद्याचं राज्य या मूल्यांवरचा विश्वास हा या भागीदारीचा पाया असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- राज्यातल्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

- मुंबई मेट्रो ३ चा आचार्य अत्रे चौक ते कफ परेड दरम्यानचा अखेरचा टप्पा आज सकाळपासून प्रवाशांसाठी खुला

**आणि**

- खोकल्याच्या औषधामुळे बालकांचा मृत्यू झाल्याप्रकरणी संबंधित औषध उत्पादकाला अटक

**<><><><><><>**

भारत आणि युनायटेड किंग्डम नैसर्गिकरीत्या भागीदार असून लोकशाही, स्वातंत्र्य आणि कायद्याचं राज्य या मूल्यांवरचा विश्वास हा या भागीदारीचा पाया असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मुंबईत आज युकेचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांच्याशी प्रतिनिधी मंडळस्तरावर चर्चा झाल्यानंतर ते संयुक्तपणे पत्रकारांना संबोधित करत होते.

ब्रिटनच्या प्रधानमंत्र्यांचा भारत दौरा हा दोन्ही देशातल्या भागीदारीतल्या व्यापक दृष्टी आणि ऊर्जेचं प्रतीक असून ही भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीचा आधार बनेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. संरक्षणविषयक सहकार्याचा उल्लेख त्यांनी केला…..

**होल्ड - बाईट - प्रधानमंत्री**

अलिकडेच भारत-ब्रिटन दरम्यान झालेल्या मुक्त व्यापार करारामुळे दोन्ही देशांचा व्यापार वाढेल तसंच रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असं प्रधानमंत्री म्हणाले. स्टार्मर यांच्यासोबत इंडो-पॅसिफीक क्षेत्रात शांतता प्रस्थापित करणं, युक्रेन-रशिया आणि गाझापट्टीतील संघर्ष थांबवण्याबाबत चर्चा झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं युक्रेन-रशिया आणि गाझातील संघर्षावर शांततापूर्ण मार्गाने तोडगा काढावा यासाठी भारताचा पाठिंबा असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

या बैठकीत संयुक्त आर्थिक आणि व्यापार समितीच्या पुनर्स्थापनेसाठी अटीशर्तीवर स्वाक्षरी झाल्याचं वाणिज्य आणि उद्योजकता मंत्री पीयूष गोयल यांनी समाजमाध्यमावर सांगितलं. यामुळे भारत-ब्रिटन मुक्त व्यापार कराराला चालना मिळेल असं ते म्हणाले.

त्याआधी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांचं आज मुंबईत राजभवन इथं स्वागत केलं. प्रधानमंत्री मोदी आणि कीर स्टार्मर आज ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये सहभागी होतील आणि उपस्थितांना संबोधित करतील. फिनटेकच्या निमित्ताने आयोजित प्रदर्शनाला दोन्ही नेत्यांनी भेट दिली.

**<><><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज  ऑस्ट्रेलियाची राजधानी कॅनबेरा इथे ऑस्ट्रेलियाचे उपप्रधानमंत्री आणि संरक्षणमंत्री रिचर्ड मार्लेस यांच्याशी विविध मुद्द्यांवर चर्चा केली.  यात संरक्षण उद्योग, सायबर सुरक्षा, सागरी सुरक्षा आणि क्षेत्रीय आव्हानं या मुद्द्यांचा  समावेश होता. ऑस्ट्रेलियाने सीमापार दहशतवादाच्या मुद्द्यावर भारताला दिलेल्या पाठिंब्याबद्दल राजनाथ सिंह यांनी समाजमाध्यमावर आभार मानले आहेत. दोन्ही नेत्यांच्या उपस्थितीत अनेक महत्त्वाच्या संरक्षणविषयक करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या.

**<><><><><><>**

राज्यातल्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकांची प्रारूप मतदार यादी काल राज्य निवडणूक आयोगानं प्रसिद्ध केली. या यादीतली नावे mahasecvoterlist.in या वेबसाइटवर मतदारांना शोधता येतील. तहसील, नगर परिषद आणि नगर पंचायतीच्या कार्यालयातही ही यादी उपलब्ध आहे. १ जुलै २०२५ रोजी विधानसभा मतदार यादीत नाव असलेल्यांचा समावेश या यादीत करण्यात आला आहे.

<><><><><><>

राज्यातल्या पूरग्रस्तांना मदत म्हणून १ दिवसाचा पगार मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करण्याचं आवाहन राज्य सरकारनं सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केलं आहे. त्यासाठीचं संमतीपत्रक कार्यालयात उपलब्ध करुन देण्याचे आदेश सरकारनं काल जारी केले. राज्य सरकारच्या सेवेतले सर्व अधिकारी-कर्मचारी, विविध स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम, महामंडळातल्या अधिकारी - कर्मचाऱ्यांनाही त्यांचं एक दिवसाचं वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करता येईल.

<><><><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात विरोधातल्या उमेदवाराला लक्ष्य बनवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करु नये असे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. आदर्श आचारसंहितेत या निर्देशांचा समावेश केला आहे. समाजमाध्यमांवर चुकीची, बनावट आणि दिशाभूल करणारी माहिती कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने देण्यावर बंदी घातली आहे. प्रचारातल्या चित्र, चित्रफीत अथवा ध्वनिफितीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला असल्यास तसं लेबल त्यावर लावणं आवश्यक आहे. समाजमाध्यमावर सक्रीय असणाऱ्यांमुळे निवडणुकीचं वातावरण बिघडू नये याकरता कडक नजर ठेवण्यात येईल, असं आयोगाने स्पष्ट केलं आहे.

<><><><><><>

मुंबई मेट्रो ३ चा आचार्य अत्रे चौक ते कफ परेड दरम्यानचा अखेरचा टप्पा आज सकाळपासून प्रवाशांसाठी खुला झाला आहे. आज सकाळी पाच वाजून ५५ मिनिटांनी जाणारी आणि येणारी पहिली मेट्रो आरे आणि कफ परेड अशा दोन्ही स्थानकांतून रवाना झाली. तर रात्री साडे दहा वाजता शेवटची मेट्रो असेल. यामुळं मंत्रालय, विधानभवन, कफ परेड सारख्या भागात थेट मेट्रोनं जाण्याची सुविधा उपलब्ध झाल्यानं काही ठिकाणी सकाळी नागरिकांनी प्रवासासाठी गर्दी केली होती. सीएसएमटी स्थानकालगतच्या सबवेमधून थेट मेट्रोच्या स्थानकात प्रवेश करण्याची सोय यात उपलब्ध आहे. या मेट्रोच्या माध्यमातून प्रवासाचा वेळ वाचणार असून लोकल सुविधा उपलब्ध नसलेली काही ठिकाणं मेट्रोनं जोडली जाणार असल्यानं प्रवाशांमध्ये उत्साहाचं वातावरण दिसून आलं.

<><><><><><>

खोकल्याच्या औषधामुळे बालकांचा मृत्यू झाल्याप्रकरणी संबंधित औषध उत्पादकाला अटक केली आहे. मध्यप्रदेश पोलिसांच्या विशेष तपास पथकाने तामिळनाडूत कांचीपुरम इथं आज सकाळी ही कारवाई केली. या औषधाच्या सेवनामुळे मध्यप्रदेश आणि राजस्थानात अनेक बालकांचा मृत्यू झाल्याचा संशय आहे. तपास अधिकाऱ्यांनी श्रीशन फार्मा या औषध कंपनीच्या कारखान्यावर छापे टाकून काही नमुने आणि कागदपत्रं ताब्यात घेतली असून कारखाना सील केला आहे.

<><><><><><>

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांना येत्या दिवाळीसाठी २२ हजार रुपये इतकं सानुग्रह अनुदान मंजूर झालं आहे. हे अनुदान तातडीने कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचे निर्देश आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी दिले आहेत.

<><><><><><>

नवी मुंबई महापालिकेत चार सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर आज नियुक्तीपत्र देण्यात आलं. यात गट क मधे रोखपाल पदावर एक, तर गट ड मधे तीन उमेदवारांची सफाई कर्मचारी पदावर नियुक्ती झाली.

<><><><><><>

पुण्यात कोंढवा परिसरात दहशतवाद विरोधी पथक आणि पुणे पोलिसांनी संयुक्तरित्या १९ ठिकाणांवर छापे टाकले. या प्रकरणी २५ जणांना ताब्यात घेण्यात आलं असून त्यांचा दहशतवादी संघटनाशी संबंध असल्याचा संशय आहे. अद्याप संशयितांची चौकशी सुरू आहे.

<><><><><><>

हिंगोली जिल्ह्यात वसमत- कुरुंदा मार्गावर उघडी नदीजवळ काल रात्री टिपर आणि दुचाकीची टक्कर होऊन दोघे दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले होते. उपचारादरम्यान त्या दोघांचा मृत्यू झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलीस तिथे दाखल झाले आणि जखमींना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केलं होतं. पुढे त्यांना नांदेडच्या रुग्णालयात पाठवलं होत परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

<><><><><><>

महिला क्रिकेट विश्व चषक स्पर्धेत आज भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. विशाखापट्टणम् इथं होणाऱ्या या सामन्याला पावसामुळे उशीर झाला आहे. आता नाणेफेक सव्वा तीन वाजता होईल आणि सामना पावणे ४ वाजता सुरू होईल. पण या सामन्यातल्या षटकांची संख्या कमी करण्यात आलेली नाही.

या स्पर्धेत सलग दोन सामने भारतानं जिंकले आहेत.

<><><><><><>

फिनलंड मधल्या अस्पु इथे सुरु असलेल्या आर्क्टिक खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुषांच्या एकेरी गटात भारताच्या थरून मन्नेपल्ली याने फ्रान्सच्या टोमा जुनियर पोपोव्ह चा पराभव करून उपउपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. याआधी भारताच्या लक्ष्य सेन ला जपानच्या कोडाई नाराओका कडून पराभव पत्करावा लागला. किदम्बी श्रीकांतने डेन्मार्क च्या रासमस जेमके ला वॉक ओव्हर दिला, किरण जॉर्ज ला दुखापतीमुळे सामना सोडावा लागला, तर शंकर सुब्रमण्यम आणि आयुष शेट्टी पराभूत झाले आहेत.

//<><><><><><>//